# प्रवासी

जीवन प्रवास गूढ, कोणी कसा केला
कोणी हसत निभावले, रडून कोणी केला॥ १ ॥

प्रवासी दिसले कोणी, चालता पथात
एकलाच गेला कोणी, हात कोणी केला॥ २ ॥

साथीदार कोणाचा, सोडूनी मधेच गेला
संपले तिथेच कोणी, मार्गस्थ कोणी झाला ॥ ३ ॥

प्रवास दूरचा, निश्चय निघताना केला
प्रारंभीच कोणी, शेवटी कोणी विसरला॥ ४ ॥

प्रवास तत्व ठरले, खुणगाठ बांधलेला
मोडले तत्व कोणाचे, प्रवास कुणाचा तुटला ॥ ५ ॥

कधी बिकट कधी सोपी, संमिश्र वाट होती
थकला मधेच कोणी, कोणी खुणा सोडूनी गेला ॥ ६ ॥

प्रवास पूर्ण कोणाचा, हर्षोल्हास कोणा झाला
नि:श्वास सोडला कोणी, साजरा कोणी केला॥ ७ ॥

प्रवासी अनेक पंथी, दर्जा कोणाचा कसला
विस्मृतीत गेला कोणी, पुतळ्यात कोणी वसला ॥ ८ ॥

संपला प्रवास ज्यांचा, अनुमान हिशोब केला
व्यर्थ; शून्यप्राप्ती कोणा, अर्थपूर्ण कोणाचा झाला॥ ९॥

© सचिन पु. कुलकर्णी (sachin.kulkarni78@gmail.com)
www.saarthbodh.com